### ठक्कर समूहाच्या

# एक लाख झाडे लागवड मोहिमेचा शुभारंभ




❑ ठक्कर समूहाच्या 'हरित नाशिक' मोहिमेचा शुभारंभ करताना वनाधिपती विनायकदादा पाटील. समवेत जितेंद्र ठक्कर, किरण चव्हाण, वसंत गिते, देवीदास पिंगळे आदी मान्यवर

**नाशिक । दि. १६ प्रतिनिधी**

स्थावर मालमत्ता विकसन क्षेत्रात ५० वर्ष पूर्ण करणाऱ्या ठक्कर्स समूहाने आपला सुवर्णमहोत्सव आगळ्या वेगळ्या पध्दतीने साजरा केला. या निमित्ताने सर्व प्रकल्पांवर एक लाख झाडे लावण्याचा निर्धार करण्यात आला असून 'हरित नाशिक' या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वनाधिपती विनायकदादा पाटील, समूहाचे संचालक जितेंद्र ठक्कर, क्रेडाई अध्यक्ष किरण चव्हाण, आमदार वसंत गिते, माजी खासदार देवीदास पिंगळे, प्रसिध्द विकासक नेमिचंद पोद्दार, नगरसेवक अशोक मुर्तडक, डॉ काकतकर, ॲड. एस.एल.देशपांडे आदी उपस्थित होते.

ठक्कर समूहाचे आजपर्यंत ४२,००० ग्राहक झाले असून ग्राहकांच्या कुटुंबातील सदस्यांचा सहभाग घेऊन ही मोहीम राबवणार असल्याचे ठक्कर समूहाचे संचालक जितेंद्र ठक्कर यांनी स्पष्ट केले. विनायकदादा पाटील म्हणाले की कोणते झाड कोठे लावावे याचा पूर्ण विचार करूनच वृक्ष लागवड करावी. झाड मोठे झाल्यानंतर वाढीसाठी पुरेशी जागा नसल्याने तोडावे लागणार नाही अशा ठिकाणी झाडे लावावी असेही त्यांनी यावेळी सांगितले.ठक्कर समूहाचा स्तुत्य उपक्रम असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.